# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३६९/२०२४ दिनांक:- ०४/१०/२०२४

## प्रेस नोट

**“मोबाईल टॉवरवर रेडीओ फ्रिक्वेन्सी साठी लावण्यात येणारे मशिन / AZNA कार्ड (RR UNIT) चोरी करुन विक्री करणारी टोळी पकडण्यात गुन्हे शाखा कक्ष - ३ विरार यांना यश.!!”**

दिनांक :- २२/०८/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वा. चे सुमारास फेन अव्हेन्यु अपार्टमेंट, मदर मेरी शाळेचे समोर, नालासोपारा पुर्व या बिल्डींग वरती बसविण्यात आलेला एअरटेल टॉवर क्र - १२८६२७२/१२७००९७ येथे 5G नेटवर्कसाठी बसविण्यात आलेले रेडीओ फ्रिक्वेन्सी साठीचे AZNA कार्ड (RR UNIT) हे कोणीतरी अज्ञात चोरटयाने स्वता:चे फायदयाकरीता फिर्यादी यांच्या संमतीशिवाय, लबाडीच्या इरादयाने चोरुन नेले म्हणुन दिनांक १४/०९/२०२४ रोजी आचोळे पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ३७१/२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५(ए), ३(५), ३१७(४) सह टेलीकम्युनिकेशन ॲक्ट २०२३ चे कलम ४२(१)(२)(३)(६), ४८ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महीण्यांपासुन मोबाईल टॉवरवरील नेटवर्कसाठी बसविण्यात आलेले रेडीओ फ्रिक्वेन्सी मशिन (RR UNIT) चोरीच्या गुन्हयात वाढ झाल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन मा. वरिष्ठांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष-३, यांचेकडे वर्ग करण्यात आला. सदर गुन्हयाचा गुन्हे शाखा कक्ष-३ पथकाने घटनास्थळाचे तांत्रिक विश्लेषण करुन तसेच गोपणीय बातमीवरुन आरोपीत नामे - १) शुभम बिनयकुमार यादव वय २४ वर्षे, रा. वाकोला, सांताक्रुज पुर्व, मुंबई. २) शैलेश रामअभिलाश यादव वय २५ वर्षे, रा. अंधेरी पुर्व, मुंबई ३) कपुरचंद्र सुरेश गुप्ता, वय २५ वर्षे, रा. ॲन्टॉपहील, मुंबई ४) बंन्सीलाल केवलचंद जैन वय ५० वर्षे रा. राणीबाग, मुंबई २७ यांना मुंबई येथून आरोपी क्रमांक ५) जाकीर मो.सलीम मल्लीक वय २५ वर्षे, रा. मुस्तफाबाद, पो.स्टे. दयालपुर, जि. दिल्ली ६) जैद अन्वर मलीक वय १९ वर्षे, रा. मुस्तफाबाद, पो.स्टे. दयालपुर, जि. दिल्ली यांना मुस्तफाबाद, दिल्ली येथून तसेच आरोपी क्रमांक ७) मो.जुनैद मो.आरीफ मलिक वय २४ वर्षे रा. लोणी, जि.गाझियाबाद, राज्य उत्तरप्रदेश यास गाझियाबाद, उत्तरप्रदेश येथून ताब्यात घेवून सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. नमुद आरोपी यांचेकडुन अदयापपर्यंत एकुण ४०,००,०००/- ( चाळीस लाख रुपये किंमतीचे ) मोबाईल टॉवरवर रेडीओ फ्रिक्वेन्सी साठी लावण्यात येणारे एकुण ३६ मशिन / कार्ड (RR UNIT), मोबाईल फोन, गुन्हा करताना वापरलेली मोटर सायकल असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. अटक आरोपी यांचेकडे करण्यात आलेल्या प्राथमिक तपासात खालील नमुद गुन्हयात त्यांचा सहभाग निष्पन्न होत आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १. | आचोळा पोलीस ठाणे | ३७१/२०२४ बी.एन.एस. कलम ३०५(अ), ३(५) प्रमाणे |
| २. | वालीव पोलीस ठाणे | २२४/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ३. | वालीव पोलीस ठाणे | ३९३/२०२४ बी.एन.एस. कलम ३०५ प्रमाणे |
| ४. | वालीव पोलीस ठाणे | २०३/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ५ | वालीव पोलीस ठाणे | ८८५/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ६. | पेल्हार पोलीस ठाणे | १३८/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ७. | पेल्हार पोलीस ठाणे | २९/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ८. | पेल्हार पोलीस ठाणे | ५७३/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ९. | पेल्हार पोलीस ठाणे | ६७०/२०२४ बी.एन.एस. कलम ३०५ प्रमाणे |
| १०. | विरार पोलीस ठाणे | ११३२/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ११. | विरार पोलीस ठाणे | २०१/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| १२. | विरार पोलीस ठाणे | ६९७/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| १३. | सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई | ४३०/२०२४ बी.एन.एस. कलम ३०५ (ए) प्रमाणे |
| १४. | कुरार पोलीस ठाणे, मुंबई | ५९९/२०२४ बी.एन.एस. कलम ३०५ (ए) प्रमाणे |
| १५. | घाटकोपर पोलीस ठाणे, मुंबई | ई तक्रार ७८४२५/२०२४ |
| १६. | कल्याण रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई रेल्वे | १६५५/२०२४ बी.एन.एस.. ३०३ (२) प्रमाणे |
| १७. | कळवा पोलीस ठाणे, ठाणे शहर | २९२०/२०२४ बी.एन.एस. ३०३ (२) प्रमाणे |
| १८. | मुंब्रा पोलीस ठाणे, ठाणे शहर | १२३१/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| १९. | अंबरनाथ पोलीस ठाणे, ठाणे शहर | ई तक्रार १९३९९००१०७२४०००७१ |
| २०. | कोतवाली थाना, पुर्व चंपारण्य, बिहार | १९७/२०२४ बी.एन.एस. ३०३ (२) प्रमाणे |

अटक आरोपी सदर चोरीचे मशिन हे **हाँगकाँग व चीन** येथे बेकायदेशीर रित्या विक्री करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अटक आरोपी यांचेकडून बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, पंजाब, गोवा इ. राज्यातून चोरी केलेले AZNA कार्ड (RR UNIT) हस्तगत करण्यात आले आहेत. अटक आरोपी यांनी मागील एक वर्षापासून मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई-विरार-नालासोपारा परिसरात मोठया प्रमाणात AZNA कार्ड (RR UNIT) ची चोरी केल्याचे तपासात निष्पन्न होत आहे. आरोपी हे सद्य:स्थितीत पोलीस कोठडी मध्ये आहेत.

सदरचे मशिन/ AZNA कार्ड (RR UNIT) हाँगकाँग व चीन येथे पाठवून त्यांचे सॉफ्टवेअर व हार्डवेअर मध्ये बदल करुन पुन्हा काळया बाजारात जास्त किंमतीत विक्री केले जात असावेत याबाबत सखोल तपास सुरु आहे. देशातील विविध राज्यांतील अशा पध्दतीचे गुन्हे मोठया प्रमाणावर उघडकीस येण्याची शक्यता आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/ प्रमोद बडाख, सपोनि/ सोपान पाटील, पोउपनिरी/ उमेश भागवत, सफौ/ अशोक पाटील, पोहवा/मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, मनोज तारडे, तुषार दळवी, आतिश पवार, म.सु.ब/ प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ तसेच सफौ/ संतोष चव्हाण, सायबर सेल यांनी पार पाडली आहे.

-----ooo-----